साईज 8X14 cm

## जाहीर नोटीस

महापारेषण कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, महापारेषण कंपनी परभणी जिंतुर रोड, गणपती चौक, नविन पॉवर हाऊस, परभणी - ४३१४०१ अंतर्गत शिकाउ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाउ उमेदवार म्हणुन सन २०२५-२६ करीता वीजतंत्री (ईलेक्टिशयन) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाउ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर opportunity या सदरा खाली या कार्यालयाचा अस्थापना क्र. **E05202700376** वर ऑनलाईन अर्ज सादर करावा. ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. २८.१२.२०२५ चे रात्री २३.५९ वाजेपर्यंत राहिल. तसेच सर्व कागदपत्रे जाडुन जाहिरातीसोबत जोडलेला अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक ३१.१२.२०२५ चे १८.१५ वाजेपर्यंत राहिल

सविस्तर माहितीसाठी www.mahatransco.in या संकेत स्थळावर Carrier या सदरा खाली संपुर्ण जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(एस.सी.महाले)
**कार्यकारी अभियंता**
अउदा (संवसु) विभाग परभणी

महापारेषण
(CIN NO-U40109MH2005SGC153646)
(GST NO-27AAECM2936N1Z2)
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
कार्यालयाचे नाव-कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
कार्यालयाचा पत्ता-अउदा संवसु विभाग,परभणी ,१३२ के.व्ही.उपकेंद्र, परिसर, जिंतुर रोड, परभणी-४३१४०१
संपर्क क्र व ईमेल- ८९५६७६९३८० / ee2120@ mahatransco.in

जा.क्र.काअ/अउदा/संवसु /वि/परभणी/मासं/ No 1061 दिनांक :- 11 DEC 2025

## जाहीर नोटीस

महापारेषण कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, महापारेषण कंपनी परभणी जिंतुर रोड, गणपती चौक, नविन पॉवर हाऊस, परभणी - ४३१४०१ अंतर्गत शिकाउ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाउ उमेदवार म्हणुन सन २०२५-२६ करीता वीजतंत्री (ईलेक्टिशयन) या ट्रेडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाउ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर opportunity या सदरा खाली या कार्यालयाचा अस्थापना क्र. **E05202700376** वर ऑनलाईन अर्ज सादर करावा. ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. २८.१२.२०२५ चे रात्री २३.५९ वाजेपर्यत राहिल. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाउ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच ऑफलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक ३१.१२.२०२५ चे १८.१५ वाजेपर्यत राहिल. वीजतंत्री (ईलेक्ट्रिशयन) शिकाउ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदणी क्रमांकावर करण्यात यावी.

| अस्थापनेचे नाव व रजिस्ट्रेशन क्रंमाक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| The Executive Engineer MSETCL EHV O&M Division Parbhani Code- E05202700376 | वीजतंत्री (ईलेक्ट्रिशयन) | एकुण जागा - २९ |

शिकाउ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नौकरी मिळवण्याचा कोणताही अधिकारी प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सोबत :- शिकाउ उमेदवार भरती करीता अनुसरित येणारी पध्दत, अटी व फॉर्म.

(एस.सी.महाले)
**कार्यकारी अभियंता**
अउदा (संवसु) विभाग परभणी

# शिकाऊ उमेदवार भरती करता अनुसरित येणारी पध्दत व अटी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कार्यालयाचे नाव व पत्ता | :- | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित,<br>अउदा सं व सु विभाग, परभणी<br>गणपती चौक, नविन पॉवर हाऊस , जिंतुर रोड, परभणी.४३१४०१ |
| २. | मागणी करणारे अधिकारी यांचे पदनाम | :- | कार्यकारी अभियंता |
| ३. | निवड पध्दत | :- | गुणवत्तेनुसार |
| ४. | क) भरावयाच्या पदाचे नाव व संख्या | :- | वीजतंत्री (शिकाऊ प्रशिक्षणार्थी) पदसंख्या: २९ पदे |
| | ख) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी | :- | वीजतंत्री १ वर्ष |
| | ग) विद्या वेतन | :- | शासकिय धोरणानुसार |
| ५. | शैक्षणिक अर्हता | १. | इयत्ता १० वी उत्तीर्ण व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद एन. सी. टी. व्ही. टी. नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन आय. टी. आय. दोन वर्ष वीजतंत्री (Electrician)परीक्षा उत्तार्ण असणे आवश्यक. |
| ६. | राखीव पदे | :- | कंपनीच्या धोरणानुसार |
| ७. | भरती प्रक्रियापुढील प्रमाणे राबविण्यात येईल | १. | जे उमेदवार www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करतील व त्या अर्जाची Screen shot सहीत यासोबत जोडलेला फॉर्म भरुन आवश्यक त्या दस्तऐवजासह रकाना क्र.१ मध्ये नमुद पत्त्यावर टपालाने अथवा स्वत: येवुन सादर करावा. |
| | | २. | **लगतवरच्या रकाना मध्ये नमुद असल्यानुसार दोन्ही स्वरूपात अर्ज करणा-या उमेदवारांचेच अर्ज विचारात घेतले जातील.** |
| | | ३. | आय. टी. आय. उत्तीर्ण गुण व एस. एस. सी. उत्तीर्ण गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. |
| | | ४. | कंपनीच्या विहीत तरतुदीनुसार आरक्षणानुसार निवड यादी तयार केली जाईल. एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते गुणवत्तेनुसार प्रवर्गाचा विचार न करता भरले जाईल. |
| | | ५. | निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडुन वैद्यकिय चाचणी करून घेणे बंधनकारक राहिल.तसेच निवड झालेल्या प्रत्येक उमेदवारांनी चारित्र व पुर्व चारित्र प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. |
| | | ६. | कॉन्ट्रॅक्ट रजिस्ट्रेशन झाल्याशिवाय कोणताही उमेदवार शिकाऊ उमेदवारीस पात्र ठरणार नाही. |
| ८. | वयोमर्यादा | :- | दि.३१.१२.२०२५रोजी किमान १८ वर्ष पुर्ण /कमाल ३० वर्ष (मागासवर्गीय /आर्थिक दुर्बल घटक यांना ५ वर्ष शिथील क्षम) |
| ९. | शिकाऊ उमेदवार पदे भरावयाची अंतिम तारीख | :- | ऑनलाईन अर्ज दि.२८/१२/२०२५ (२३.५९) पर्यतचे अर्ज तसेच ऑफलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक ३१.१२.२०२५ चे १८. १५ वाजेपर्यत राहिल. |
| १०. | उमेदवार यांनी घ्यावयाची काळजी बाबत | १. | उमेदवाराने आपला प्रोफाईल तपासुन घेणेची जबाबदारी उमेदवारीची असेल. |
| | | २. | ऑनलाईन अर्ज सादर करताना एस. एस. सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आय. टी.आय विजतंत्री उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करून माहिती भरावी. |
| | | ३. | एस. एस. सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र, आय. टी. आय. उत्तीर्ण सर्व सत्रांचे गुणपत्रक / प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) स्वसांक्षाकित प्रत व शाळा सोडल्याचा दाखला ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असेल तर मागासवर्ग जात प्रमाणपत्र तसेच आर्थिक दुर्बल घटक (EWS) मधुन अर्ज केला तर(EWS)प्रमाणपत्र व सामाजिक शैक्षणिक मागासा प्रवर्ग मधुन अर्ज केला तर त्या बाबतचे प्रमाणपत्र www.apprenticeshipindia.gov.in वर अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच सोबत जोडलेला विहित फॉर्म screenshot आवश्यक दस्ताऐवज सोबत सादर करणे बंधनकारक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४. | शिकाऊ उमेदवारांची सही, पालकाची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस. एस. सी मार्क, आय. टी. आय. मार्क, ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. |
| | | ५. | शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-याकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी. |
| | | ६. | शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करताना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्राची सुस्पश्ट स्कॅन करून योग्य रितीने ऑनलाईन अर्ज सादर करावा. व फॉर्म दस्ताऐवज फोटो सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| | | ७. | प्रत्येक उमेदवाराची वर्तणुक चांगली व शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे. या बाबत कोणतीही गैरवर्तणुक केल्यास शिकाऊ कायदा १९६१ मधील १७ अन्वये शिक्षेस ते पात्र ठरतील. |
| | | ८. | प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ३०० मार्कची (६ तास अवधीची) परिक्षा उमेदवाराने देणे अनिवार्य राहील. जो उमेदवार प्रशिक्षण कालावधी पुर्ण करेल तोच उमेदवार परीक्षेस बसण्यास पात्र असेल. |
| | | ९ | प्रशिक्षण घेवु ईच्छिणाऱ्या विद्यार्थ्यानां प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका /पदवी अभ्यास क्रमास प्रवेश घेतलेला नसावा. वरील कागदपत्रे न केल्यास नोंदणीधारकांना पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ईमेलव्दारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवु नये. |
| | | १० | दि.२८.१२.२०२५ रोजी २३.५९ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा तसेच दि. ३१.१२.२०२५ रोजी १६.१५ नंतर प्राप्त होणाऱ्या ऑफलाईन अर्जाचा शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| | | ११ | ऑनलाईन तसेच ऑफलाईन अर्ज सादर करताना ईमेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक कार्यान्वयीत नसल्याने संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पुर्ण जबाबदारी उमेदवारावर राहील. |
| | | १२ | शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नौकरी मिळविण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची कृपया नोंद घ्यावी. |
| | | १३ | प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही निवास व्यवस्था कंपनी कडुन मागणी करता येणार नाही. |
| | | १४ | कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणुन हजर होण्याकरिता कोणत्याही रक्कमेची प्रतिपुर्ती कंपनी देणार नाही. |
| १२. | अचुक माहिती भरणे | :- | उमेदवारांनी आपली प्रत्येक माहिती अचुकपणे विहित फॉर्म मध्ये भरावी कारण त्यात नमुद माहिती आधारे निवडयादी बनविण्यात येणार असुन त्यात पुन्हा बदल करता येणार नाही. निवड यादीत नमुद उमेदवारांचीच फक्त कागदपत्रे निवड झाल्यानंतर पडताळण्यात येतील. पडताळणी अंती अपात्र ठरल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा विचार केला जाईल. **फॉर्म मधील चुकीच्या भरलेल्या माहितीमुळे निवड झाली नाही तर त्यास संपुर्णपणे उमेदवार जबाबदार राहील.** |
| १३. | इतर संबंधित माहिती | :- | सदर शिकाऊ भरतीमध्ये अंशतः बदल किंवा संपुर्ण निर्णय घेण्याच अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील.व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक राहणार नाही. तसेच सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| १४. | निवड यादी | | www.mahatransco.in या संकेत स्थळावर Carrier या सदरा खाली प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५. | अधिक मदतीसाठी संपर्क | :- | मानव संसाधन विभागप्रमुखाचा ईमेल आयडी. dymgrhr2120@mahatransco.in |

(एस.सी.महाले)
कार्यकारी अभियंता
अउदा (संवसु) विभाग परभणी

## महापारेषण, अउदा सं व सु विभाग, परभणी
## शिकाऊ उमेदवारीसाठीचा अर्ज

(जो जाहिरातीत नमुद पत्त्यावर भरुन दि.३१.१२.२०२५ पाठवायचा आहे)

येथे रंगीत पासपोर्ट साईज फोटो लावावा

१. उमेदवाराचे संपुर्ण नांव (आधार व शैक्षणीक कागदपत्राशी सुसंगत) :-

२. जन्मतारीख १० वी च्या सनद नुसार :-

३. जातीचा प्रवर्ग (महाराष्ट्र शासनानुसार वर्गीकृत प्रवर्ग) (अजा/ अज/ विजा.अ/ भज.ब/ भज.क/भजड / विमाप्र/ इमाव/ ईडब्ल्युएस/ सा.शै.दु.घ. /खुला) :-

४. आधार कमांक :-

५. दहावीचे गुण — एकुण गुण :-   प्राप्त गुण   टककेवारी

६. आय.टी.आय.चे गुण (चार सत्रे) :-

| | | |
|---|---|---|
| प्रथम सत्र एकुण गुण | प्राप्त गुण | टककेवारी |
| द्वितीय सत्र एकुण गुण | प्राप्त गुण | टककेवारी |
| तृतीय सत्र एकुण गुण | प्राप्त गुण | टककेवारी |
| चतुर्थ सत्र एकुण गुण | प्राप्त गुण | टककेवारी |

७. सध्याचा पत्ता :-

८. भ्रमणध्वनी कमांक :-

९. अचुक व कार्यान्वीत ई.मेल पत्ता :-

### प्रतिज्ञापत्र

वर उल्लेखित माहिती ही खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी कुठल्याही पातळीवर रद्द होऊ शकते याची मला कल्पना आहे. अशी उमेदवारी रद्द केल्यास माझी कुठलीही हरकत असणार नाही.

------------------

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

### सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे

- आधार कार्ड (होय / नाही)
- दहावीची सनद (होय / नाही)
- दहावीची गुणपत्रक (होय / नाही)
- आय.टी.आय. चे चार सत्राची गुणपत्रके (होय / नाही)
- मागासवर्गीय असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (होय / नाही)
- समाजिक शैक्षणीक दुर्बल तसेच आर्थिक दृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र इ. (होय /नाही)
- www.apprentieshipindia.gov.in याव्दारे ऑनलाईन अर्ज केल्याचे Screen shot जोडावे (होय / नाही)